एम. बी. बी.एस. अभ्यासक्रम महाविद्यालयाला मान्यता देण्याबाबत.

अजित सीड्स प्रा. लि., मु. पो. चितेगांव, ता. पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर संचलित ए.एस.पी.एल., सी.एस.एम.एस.एस. मेडिकल कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, मु. पो. लिबेजळगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक एमईडी-२०२४/प्र.क्र.६८ (ई-८२६९८२)/२४/शिक्षण-१,

९वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१.

दिनांक :- ०९ सप्टेंबर, २०२६

वाचा :- १) शासनाचे समक्रमांकाचे आवश्यकता प्रमाणपत्र क्र. एमईडी-२०२४/प्र.क्र.६८ (ई-८२६९८२)/२४/शिक्षण-१ , दि.०९.१०.२०२४

२) राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे आदेश क्र. N-CDN-१६०१३/६/२०२६-CDN-NMC, दि.१७.८.२०२६

**प्रस्तावना:-**

अजित सीड्स प्रा. लि., मु. पो. चितेगांव, ता. पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर संचलित ए.एस.पी.एल., सी.एस.एम.एस.एस. मेडिकल कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, मु. पो. लिबेजळगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर या वैद्यकीय महाविद्यालयास संदर्भ क्रमांक (१) अन्वये १५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी आवश्यकता प्रमाणपत्र देण्यात आले होते. तद्नंतर सदर प्रमाणपत्र व तपासणीच्या आधारे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी सदर महाविद्यालयासाठी संदर्भ क्रमांक (२) येथील आदेशान्वये ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी विहित कालावधीत त्रुटीपूर्तता करण्याच्या अधिन राहून परवानगी दिली आहे. त्यानुषंगाने सदर संस्थेस शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ साठी एम.बी.बी.एस. (वैद्यकीय) अभ्यासक्रमास प्रथम वर्षाकरिता ५० विद्यार्थी प्रवेशित करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्रमांक (२) येथील आदेशान्वये दिलेल्या परवानगीच्या अनुषंगाने अजित सीड्स प्रा. लि., मु. पो. चितेगांव, ता. पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर संचलित ए.एस.पी.एल., सी.एस.एम.एस.एस. मेडिकल कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, मु. पो. लिबेजळगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरिता ५० विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

१) अजित सीड्स प्रा. लि., मु. पो. चितेगांव, ता. पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर संचलित ए.एस.पी.एल., सी.एस.एम.एस.एस. मेडिकल कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, मु.पो.

लिबेजळगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी या वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी निर्धारित केल्यानुसार ५० एवढी राहील.

२) अजित सीड्स प्रा. लि., मु. पो. चितेगांव, ता. पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर संचलित ए.एस.पी.एल., सी.एस.एम.एस.एस. मेडिकल कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, मु.पो. लिबेजळगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर या संस्थेने उपरोक्त वाचा क्र.२ येथील आदेशात नमूद केल्यानुसार विहित कालमर्यादेत त्रुटींची पूर्तता करुन अनुपालन अहवाल राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांना सादर करावा.

३) राज्य शासन/ केंद्र शासन/ मा. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दत अवलंबिण्यात यावी.

४) शासकीय नियम/निर्णय/अधिनियम, मा. सर्वोच्च व मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करावे.

५) केंद्र शासन, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

६) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८ चा ६) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

७) सदर संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

८) शासकीय वैद्यकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

९) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करू नये.

१०) केंद्र शासनाने दिलेली परवानगी ही सन २०२६-२७ वर्षाकरिता प्रवेशित होणारे विद्यार्थी सदर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षामध्ये दाखल होईपर्यंत असून संस्थेने त्यानुसार पुढील वर्षाचे विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाच्या परवानगीचे नूतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील.

११) **प्रवेश प्रक्रिया:-** संस्थेतील अभ्यासक्रमाचे प्रवेश हे प्रचलित नियमांनुसार करणे आवश्यक राहील. तसेच संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्याकडून मंजूर करुन घेणेही आवश्यक राहील.

१२) **शुल्क संरचना:-** सदर वैद्यकीय महाविद्यालय नफा कमविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेले असल्याने तेथे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व संवर्गातील विद्यार्थी प्रवेशांना अभिमत विद्यापिठासाठी लागू असलेल्या शुल्काच्या अटी लागू राहतील. तसेच सदर

महाविद्यालयामध्ये प्रवेशित कोणत्याही संवर्गातील विद्यार्थ्यांना शासनाची कोणतीही शिष्यवृत्ती/शुल्कप्रतिपूर्ती योजना अनुज्ञेय राहणार नाही.

१३) सदर आदेश संदर्भ क्र.(२) येथील राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या दिनांक १७.८.२०२६ रोजीच्या आदेशान्वये दिलेली परवानगी विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANDEEP GORAKHNATH DHAKANE

Digitally signed by SANDEEP GORAKHNATH DHAKANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=418588839686584ca25060bf57af23a4473234ebcc421d084d8890fc37c8f673, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E7844D71EACB46FA051532FB66A73DA715F678033161C1162FA83F6713D03552, cn=SANDEEP GORAKHNATH DHAKANE
Date: 2026.09.09 11:43:26 +05'30'

(संदीप ढाकणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई.
७) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रज्ञान इमारत, ३०५, ३रा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई
८) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई.
९) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण आणि आयुष, मुंबई.
१०) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई.
११) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
१२) सर्व सह सचिव/उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये.
१४) अधिष्ठाता, अजित सीड्स प्रा. लि., मु. पो. चितेगांव, ता. पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर
१५) निवडनस्ती (शिक्षण-१).